# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email:- gug.registrar@gmail.com  दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४  email:-gondwanaesst@gmail.com

जा.क्र. गो.वि./आस्था./०३६२/२०२१ दि. ३०/०९/२०२१

## अधिसुचना

दि. ०२ ऑक्टोंबर, २०२० ते दि. ०२ ऑक्टोंबर, २०२१ हे वर्ष गोंडवाना विद्यापीठ दशमानोत्सव वर्ष म्हणून साजरे करीत आहे. त्यानिमित्याने दि. ०३ ऑक्टोंबर ते ०५ ऑक्टोंबर २०२१ पर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. ह्या कार्यक्रमांचा उद्घाटन सोहळा विद्यापीठाचे मा. कुलगुरु महोदय प्रा. श्रीनिवास वरखेडी यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०३ ऑक्टोंबर, २०२१ रोजी सकाळी १०.३० वाजता कोव्हिड-१९ च्या पार्श्वभुमीवर गर्दी टाळण्याच्या दृष्टीने गोंडवाना विद्यापीठ परिसराऐवजी **महाराजा हॉल, सिटी हार्ट हॉटेलजवळ, धानोरा रोड, गडचिरोली येथे** संपन्न होणार आहे. सदर उद्घाटन सोहळ्याचे उद्घाटक म्हणून मा. ना. श्री. विजय वडेट्टीवार, मंत्री, इमाव, बहुजन कल्याण विभाग, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन महाराष्ट्र राज्य तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री हे लाभणार असून सदर कार्यक्रमास मुख्य अतिथी व प्रतिष्ठीत मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

करीता सर्व संबंधितांना याद्वारे अधिसुचित करण्यात येत आहे.

**(डॉ. अनिल चिताडे)**
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरु यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. सन्माननिय सदस्य, सर्व प्राधिकरणे, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
४. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी सदरहू अधिसुचना कृपया, आपल्या अधिनस्त अधिकारी, शिक्षक, कर्मचारी तसेच विद्यार्थी यांच्या माहितीकरीता निदर्शनास आणून द्यावे.
५. मा. सर्व शैक्षणिक तसेच प्रशासकीय विभाग प्रमुख/युनिट प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी सदरहू अधिसुचना कृपया, आपल्या अधिनस्त अधिकारी, शिक्षक व कर्मचारी यांच्या माहितीकरीता निदर्शनास आणून द्यावे.
६. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर अधिसुचना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.
७. आस्थापना व प्रशासन विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**(डॉ. विजय सिलारे)**
उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली